नि.फौ.ख.क्र. ३८२/२०२४
सरकार/ प्रदीप शेटे
नि.क्र.३६
साक्षीदार क्र.२

शपथेवर सांगतो की,
माझे नावः– धनश्री संदीप शेटे
वय– ३५ वर्षे, धंदा– घरकाम
रा. वारणाली, विद्यानगर, सांगली.

<u>सरतपास सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एम.डी.बागल यांचेमार्फत</u> –

१. सन २०२४ मध्ये मी वर नमूद पत्यावर राहण्यास होते. माझ्या घरी मी, माझे पती, दोन मुली, एक मुलगा व सासू असे असतो. २०२४ माझे पतीचे राजवाडा कोर्ट येथे टायपिंगचे दुकान होते. आरोपी क्र.१ हा माझा चुलतदीर आहे. त्याचेही माझ्या पतीच्या दुकानाच्या शेजारी टायपिंगचे दुकान आहे. घटना २०२४ मधील एप्रिल महिन्यात ५.३० ते ६ च्या दरम्यान घडली. त्यावेळी माझे पती व आरोपीमध्ये किरकोळ वादावादी झाली होती. त्यावेळी त्यांच्यामध्ये दुकानवाटपावरुन किरकोळ वादावादी झाली होती. वादावादीनंतर ते दोघेही तिथून निघून गेलो. त्यावेळी मी माझ्या घरी होते. त्यावेळी केवळ आरोपी क्र.१ व माझ्या पतीमध्ये वादावादी झाली होती. मी आरोपी क्र.२ ते ४ यांना ओळखते. आरोपी क्र.१ ते ४ यांनी मला व माझ्या पतीला मारहाण केली, धमकी दिली, शिवीगाळ केली अशी घटना घडलेली नाही. सचिन अथणी हा माझा भाऊ असून तो नांद्रे येथे राहण्यास आहे. दिनांक ०३/०४/२०२४ रोजी सायंकाळी ५ च्या दरम्यान माझे पती दुकानात काम करत असताना आरोपी क्र.१ याने माझ्या भावाने केलेली तक्रार माघार घेण्यासाठी माझ्या पतीला काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच मला देखील शिवीगाळ केली असे काही घडले नाही. किरकोळ वादावादीमुळे माझ्या पतीने आरोपींविरुध्द पोलीसात फिर्याद दाखल केली होती.

**(साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकिलांनी साक्षीदारास उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

२. माझ्या भावाने आरोपी क्र.१ विरुध्द एप्रिल २०२४ च्या पूर्वी ६ महिने फिर्याद दाखल केली होती किंवा हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, आरोपी माझ्या पतीवर व माझ्या भावावर चिडून होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०४/२०२४ रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास आरोपी क्र.१ हा दारु पिवून माझ्या पतीच्या दुकानाबाहेर आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ माझ्या पतीला म्हणाला की मेहुण्याने केलेली तक्रार मागे घ्यायला सांगून शिवीगाळ करु लागला व दुकाना शेजारील काठी घेवून त्यांच्या अंगावर धावून आला व त्यांना काठीने उजव्या हाताच्या मनगटावर व डाव्या हातावर मारहाण करुन निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, सर्व प्रकार माझ्या पतीने मला फोन करुन सांगितला व मला दुकानात बोलवून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा आरोपी क्र.२ ते ४ यांना घेवून आला व पुन्हा माझ्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण करु लागला व शिवीगाळ करु लागला. हे म्हणणे खरे नाही की, मी भांडणे सोडवायला आली असता आरोपींनी मला 'रांड, उंडगे' अशी शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी देवून निघून गेले. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे पती मिळून सांगली शहर पोलीस ठाण्यात फिर्याद देण्याकरीता गेलो असता पोलीसांनी आम्हाला उपचारासाठी सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे पाठवले व तेथून उपचार घेवून आल्यानंतर आम्ही फिर्याद दाखल केली. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकीत भाग क दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो पोलीसांनी का नमूद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीसांनी माझा दिनांक ०८/०४/२०२४ रोजी पुरवणी जबाब नोंदवला किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद नोंदवतेवेळी आरोपी क्र.२ ते ४ यांची नावे माहिती नव्हती ती पोलीसांनी मला तपासादरम्यान सांगितली व त्यानुसार माझा पुरवणी जबाब नोंदवून आरोपींची ओळख पटवून घेतली. आता मला माझ्या पुरवणी जबाबातील अधोरेखांकीत भाग ड दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो पोलीसांनी का नमूद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यामध्ये तडजोड झाली असून आमचे आपसात मिटलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे पुरसिस दाखल आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा माझा चुलत दिर असून त्याला शिक्षा होवू नये म्हणून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला मराठी लिहिता वाचता

येते व कोणत्याही कागदावर सही करण्यापूर्वी मी तो वाचून पाहत असते. हे म्हणणे खरे नाही की, सदर कामातील जबाबावर मी तो वाचूनच सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर माझे पती दवाखान्यात गेले होते. ते गाडीवरुन घसरुन पडल्यामुळे त्यांना जखमा झालेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मारहाण केल्यामुळे त्यांना जखमा झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला शिवीगाळ केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे श्री.आर.आर.शिंपी यांनी नाकारला.**

**वाचून पाहिले.**

----------

**साक्षीदाराची सही**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.**

ONKAR SANJAY SHASTRI

Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI
Date: 2026.04.09 17:39:04 +0530

**(ओंकार सं. शास्त्री)**

**दिनांक–०९/०४/२०२६**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सांगली**
**(न्यायालय क्र.५)**